यशवंतराव चव्हाण भवन
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/९४.९५
पुणे, दि. १५/६/९५.

प्रति,
सचिव,

चिंचवड शिक्षण प्रसारक मंडळ, चिंचवडगाव.
पुणे ३३.

विषय :- इ. ९ वी च्या वर्गास प्रथम मान्यता. ९४-९५.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल बिजलीनगर या माध्यमिक विद्यालयातील इ. ८ वी च्या वर्गास मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे आदेश क्र. ~~माध्य-२(१०)/मान्यता/पुणे/९३~~ दि. १२/७/९३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ५.२. नुसार उपरोक्त शाळेस जून १९९४ पासून इ. ९वी च्या वर्गास विना अनुदान तत्वावर खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.

१] अद्ययावत इमारत असावी.
२] विज्ञान साहित्य, ग्रंथालयासाठी पुस्तके खरेदी करावीत.
३] अध्यापनात शै. साधनांचा वापर असावा.
४] शालेयस्तर उपक्रम राबवावेत.
५] विद्यार्थी संख्या वाढवावी.
६]

मा. शि. अ. यांची
मान्य टिपणी.

शिक्षणाधिकारी [माध्य.]
जिल्हा परिषद पुणे.

प्रत,
१. मुख्याध्यापक,
न्यू इंग्लिश स्कूल, चिंचवड.
पुणे ३३.
२. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ ४/८५-९६
पुणे. दि. ४/७/९५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

न्यू इंग्लिश स्कूल, बिजलीनगर
चिंचवड, पुणे ३३.

विषय :- नैसर्गिक वाढीने ~~९ वी~~, १० वी वर्गास
परवानगी व वार्षिक तपासणीबाबत. ९५-९६

आपल्या चिंचवड शि. प्रसा. मंडळ द्वारा संचलित बिजलीनगर येथील माध्यमिक विद्यालयातील इ. ८ वी चे वर्गाल [माध्यम मराठी/~~इंग्रजी~~] सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून शासन आदेश क्र. स्स.एस.एस/१०९३/२४५०/मारि-१ दि. २/७/९३ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ९ वी~~, इ. १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरू होत असून सदर वर्गाची सन ९५-९६ या शैक्षणिक वर्षातील वार्षिक तपासणी करणेबाबत ~~उपशिक्षणाधिकारी, जि. प. पुणे /गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती~~ श्री. मराठे यांना या कार्यालयाकडून कळविणेत आलेले आहे. तरी आपण आपल्या विद्यालयातील ~~इ. ९ वी~~, इ. १० वी च्या वर्गाची वार्षिक तपासणी करून घेणेबाबत संबंधित अधिकारी यांचेशी संपर्क साधावा व त्वरित पूर्तता करून घ्यावी. वेळेत वार्षिक तपासणी होवून तपासणी अहवाल या कार्यालयास प्राप्त न झाल्यास सर्वस्वी आपणास जबाबदार समजणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

[स्वाक्षरी]

शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे. करिता.